# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक ०२/०४/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील मौजा गंगापूर फाटा उमरेड येथे दिनांक ३१/०३/२०२२ चे २१. ३० वा. ते २२.०० वा. दरम्यान उमरेड पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन उमरेड पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.–३५/ए.जे–१९३९ क्रमांकाच्या टाटा योद्धा गाडीला थांबवुन तपासले असता सदर वाहनात आरोपी नामे– प्रणय हरिचंद्र श्रीरंगे, वय २२ वर्ष, रा. अर्जुनी जि. गोंदिया याच्या ताब्यातुन ६(हेले) जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती ६,९२,०००/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई आशिष खराबे, पो.स्टे. उमरेड यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११(१),११(१)(जी),११(१)(डी),११(१)(सी)प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम ५(अ)(ए),९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम तसेच कलम १३, १७७, ३(१),१८१ मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक प्रकाश मुटकुरे मो.क्र. ९५२९३२२६०४ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. वियजकुमार मगर, अप्पर पोलिस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी उमरेड श्री. भिमराव टेळे यांचे मार्गदर्शनात ठाणेदार पोनि श्री प्रमोद घोंगे, पोलीस नाईक प्रकाश मुटकुरे, पोलीस शिपाई आशिष खराबे यांनी केलेली आहे.






**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**